C-107

राज्याचा कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीला सन २०१२-१३ साठी रु.१०२८.७५ लाख एवढा निधी मंजूर करणेबाबत करण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.कौविका-२०१२/(४७/२०१२)/व्यशि-५
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०२ जानेवारी, २०१३.

पहा:-
१. मा.मुख्य सचिव महोदय यांच्या अध्यक्षतेखाली कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत Core Group च्या दिनांक १२/०३/२०१२ रोजी झालेल्या आढावाबैठकीचे इतिवृत्त.
२. आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास यांचे पत्र क्र.१८ अ/कौविका/२०१२/प्र.क्र.२७, दिनांक १३/०४/२०१२.
३. शासन निर्णय क्र.कौविका-२०१२/(४७/२०१२)/व्यशि-५, दिनांक ०८/०६/२०१२.
४. शासन शुद्धीपत्रक क्र.कौविका-२०१२/(४७/२०१२)/व्यशि-५, दिनांक २९/११/२०१२

**शुध्दीपत्रक:-**

संदर्भ क्रमांक ४ नुसार निर्गमित करण्यात आलेले शासन शुद्धीपत्रक रद्द करण्यात येत असून सुधारीत शासन शुद्धीपत्रक पुढीलप्रमाणे;

संदर्भ क्रमांक ३ नुसार राज्याचा कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीला सन २०१२-१३ साठी रु.१०२८.७५ लाख एवढा निधी मंजूर करण्यात आला आहे.

सदर शासन निर्णयामधील मुद्या क्रमांक २ (ग) (अ) मध्ये "माहीती तंत्रज्ञान विभागाने निवड केलेल्या तज्ञ सल्लागारांच्या एका एजन्सीची निवड करुन सदर विभागाने ठरविलेल्या प्रति मनुष्य महिन्याच्या दराप्रमाणे १ वरीष्ठ सल्लागार व १ सल्लागार यांची नियुक्ती कंत्राटी पद्धतीने घेण्याचे प्रस्तावित असुन त्यासाठी रुपये ३९.६० लाख निधी." असे नमुद करण्यात आले आहे;

108

**त्याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यांत यावे.**

"माहीती तंत्रज्ञान विभागाने निवड केलेल्या तज्ञ सल्लागारांच्या एका एजन्सीची निवड करुन सदर विभागाने ठरविलेल्या प्रति मनुष्य महिन्याच्या दराप्रमाणे १ वरीष्ठ सल्लागार व १ सल्लागार यांची नियुक्ती कंत्राटी पद्धतीने घेण्याचे प्रस्तावित असुन त्यासाठी रुपये ३९.६० लाख निधी. तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागासाठी १ प्रधान सल्लागार अर्ध वेळ व २ वरीष्ठ सल्लागार पूर्णवेळ यांची नियुक्ती कंत्राटी पद्धतीने दि. ०६/०९/२०१२ पासून करण्यात आली आहे. सदरहू सल्लागारांसाठी होणारा खर्च महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीला दिनांक ०८ जून २०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या निधीमधून खर्च करण्यात यावा."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सी.के.जाधव)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति
मा. मुख्य मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक.
मा.आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास, मुंबई.
संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल (लेखा परीक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
कार्यासन व्यशि-१,२,३,४.
निवड नस्ती (व्यशि-५) ५ प्रती.